MHOS130009122024

नि.दि.दा.क्र.२९०/२०२४
अंबीका पाटुळे व इतर वि.
स्वाती शेंडगे व इतर

<u>निशानी क्र.३२ च्या अर्जावरील आदेश</u>

सदरचा अर्ज प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी त्यांच्या विरुध्द दावा 'विना कैफियत' चालविण्याचा आदेश रद्द करुन त्यांची लेखी कैफियत स्वीकारण्यासाठी दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी क्र.५ व ६ यांचे कथनानुसार, सदर प्रतिवादी यांना प्रस्तुत दाव्यासंबंधी कागदपत्रे व नकला वेळेवर न मिळाल्याने सदर प्रतिवादी हे मुदतीत लेखी कैफियत दाखल करु शकले नाहीत. सबब, सदर प्रतिवादीविरुध्द मे. न्यायालयाने दिनांक २४.१०.२०२४ रोजी 'विना कैफियत' चा आदेश पारीत केलेला आहे. सदर प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी हजर होऊन लेखी कैफियत दाखल केलेली आहे. सदर प्रतिवादीने कैफियत दाखल करण्यास जाणूनबुजून विलंब केलेला नाही. करीता प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी त्यांच्याविरुध्द दावा 'विना कैफियत' चालविणेचा आदेश रद्द होऊन त्यांची लेखी कैफियत दाखल करुन घेणेबाबत विनंती केली आहे.

०३. वादीने प्रतिवादीच्या अर्जास आक्षेप नोंदवला आहे. वादीच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.५ व ६ यांनी सदरचा अर्ज हा वादीस त्रास देण्याच्या तसेच प्रकरण लांबविण्याच्या उद्देशाने दिला आहे. करीता सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे अथवा मंजुर करण्याचे निर्णयास आल्यास सदर प्रतिवादीवर रक्कम रु.२,०००/– इतका दंड बसवण्याची मागणी केलेली आहे.

**०४.** अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचे प्रकरण हे दावा वाटपाबाबत, स्वतंत्र कब्जा मिळणेकरीता व दरम्यानचे उत्पन्न मिळणेकरीता दाखल केलेले आहे. दाव्याचे स्वरुप पाहता वादी व प्रतिवादी यांचे दोघांचे हितसंबंध गुंतलेले आहेत. नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेऊन दावा गुणदोषांवर निकाली करणे न्यायोचीत ठरते. सदर प्रतिवादीस दाव्यासंबंधी कागदपत्रे व नकला वेळेत उपलब्ध झाले नसल्यामुळे लेखी कैफियत मुदतीत दाखल करु शकले नाहीत हे कारण संयुक्तीक वाटते. परंतू, सदर प्रतिवादीस कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास निश्चीतच दावा गुणदोषावर निर्णीत करणे सोयीचे ठरते. सबब, वरील सर्व बाबींचा विचार करता व कैफियत दाखल करण्यास झालेल्या विलंबाचा विचार करता तसेच सदरचा अर्ज प्रतिवादी यांनी दावा पुराव्याकरीता लागला असताना दिला आहे. सबब, प्रतिवादी क्र.५ व ६ यांचेवर रक्कम रुपये १,०००/– एकत्रीत दंड बसवून अर्ज मंजुर करणे योग्य ठरेल. परिणमतः, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज **निशानी क्र.३२** वादीस रक्कम **रुपये १,०००/– (रुपये एक हजार फक्त)** एकत्रीत देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र.५ व ६ यांचे विरुध्दचा दावा 'विना कैफियत' चालविणेचा आदेश रद्द करण्यात येतो व त्यांची 'लेखी कैफियत' स्वीकारण्यांत येते.

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2025.08.08 17:18:58 +0530

दिनांक : ०८.०८.२०२५

( **श्रीमती ए.एस.मते** )
२रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | N. V. Koli<br>Stenographer Grade-III |
| Court | ... | 2nd Jt. Civil Court Jr. Dn., Bhoom. |
| Date | ... | 08.08.2025 |
| Order signed by the Presiding Officer on | ... | 08.08.2025 |
| Order uploaded on | ... | 08.08.2025 |